# गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

महाराष्ट्र शासन अधिसुचना क्रमांक २००७/(३२२/०७) विशि–५ महाराष्ट्र अधिनियम १९९४(१९९४ चा महा. ३५) च्या कलम ३ च्या पोटकलम (२) अन्वये दिनांक २७ सप्टेंबर, २०११ रोजी स्थापीत राज्य विद्यापीठ

**( परीक्षा विभाग )**

एम.आय.डी.सी.रोड, कॉम्प्लेक्स, गडचिरोली–४४२६०५

फोन नंबर ०७१३२–२२३१०४


जा.क्र.गों.वि./परीक्षा विभाग/2673/२०१६ दि. २१/१२/२०१६

## अधिसुचना (अत्यंत तात्काळ)

(फक्त शिक्षण विद्याशाखेकरीता)

**विषयः– शैक्षणिक सत्र २०१६–१७ बी.एड, एम.एड व बी.पी.एड च्या Provisional नामांकनाबाबत.**

गोंडवाना विद्यापीठाशी संलग्नित सर्व शिक्षण विद्याशाखे अंतर्गत ( **B.Ed, M.Ed** व **B.P.Ed**) च्या प्राचार्यांना तथा संबधितांना सुचित करण्यात येते की, सत्र २०१६–२०१७ च्या अभ्यासक्रमाकरीता **B.Ed, M.Ed** व **B.P.Ed** यांचे नामांकन प्राचार्यांचे व विद्यार्थ्यांचे विहीत हमीपत्र घेवुन तसेच तात्पुरते नामांकनाचे आवश्यक दस्ताऐवज घेवुन दिनांक ३१/१२/२०१६ पर्यन्त विद्यापीठात अंत्यत तात्काळ नामांकना करीता सादर करावे. त्यानंतर नामांकन सादर करणाऱ्या महाविद्यालयावर विद्यापीठाच्या नियमानुसार विलंब शुल्क आकारण्यात येईल.

याची सर्व शिक्षण विद्याशाखेच्या महाविद्यालयातील प्राचार्य तथा संबधितांनी नोंद घ्यावी.

(टिपः– सोबत आवश्यक हमीपत्राचे प्रारूप जोडलेले आहे.)

परीक्षा नियंत्रक<br>
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

# हमीपत्र

मी हमीपत्र लिहून देतो की, मी प्राचार्य ................................... ............... यांच्याद्वारे सत्र २०१६—२०१७ करीता B.Ed, M.Ed व B.P.Ed अभ्यासक्रमाचे (...) विद्यार्थी माझ्या महाविद्यालयातील प्रवेशित झालेले आहे.

परंतु सदर प्रवेश महाराष्ट्र राज्य, संचालक उच्च शिक्षण, पुणे यांच्याकडुन सदर अभ्यासक्रमाची यादी तपासुन अजुनपर्यंन्त आलेली नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांचे नामांकन विद्यापीठात करता आले नाही. करीता विद्यापीठाकडुन हमीपत्रावर तात्पुरते नामांकन करून तात्पुरत्या स्वरूपात विद्यार्थ्याला Provisional PRN करणे आवश्यक आहे.

जर सदर विद्यार्थ्याची यादी किंवा विद्यार्थ्याचे नाव संचालक, उच्च शिक्षण, पुणे तसेच प्रवेश नियंत्रण समिती, मुंबई यांच्याकडुन प्रमाणित करून आले नाही. तर सदर विद्यार्थ्याचा प्रवेश महाविद्यालयाकडुन व विद्यापीठाकडुन रद्य करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी महाविद्यालय प्रशासन व विद्यार्थ्याची राहिल. अशी मी हमी देतो.

दिनांक :     प्राचार्य

(टिप :— प्राचार्य यांचे अधिकृत पत्रावर लिहून घ्यावयाचे नमुना हमीपत्र)